# प्रेस नोट

दि. २४/११/२०२१

## भारतीय चलनाच्या बनावट नोटा बनविण्यास लागणारी साधनसामुग्री बाळगुन, नोटा बनवून, बाजारामध्ये वितरीत करणाऱ्या इसमास गुन्हे शाखेकडुन अटक

| | |
|---|---|
| कक्ष | गुन्हेगारी गुप्तवार्ता पथक, गु.प्र.शा.,गु.अ.वि.,गुन्हे शाखा, मुंबई |
| पोलीस ठाणे, गु.र.क्र. व कलम | गु.प्र. शा., गु. र. क्र. ८८/२०२१ कलम ४८९ (अ),४८९ (ब), ४८९ (क), ४८९ (ड), १२० (ब) भादवि.(पायधुनी पोलीस ठाणे, मुंबई, गु.नो. क्र. ६३७/२०२१) |
| गुन्हा घडला दिनांक वेळ व ठिकाण | दिनांक २३/११/२०२१ रोजी १९.३० वा. चे सुमारास व त्यापूर्वी ठिकाण-६६/६८, करिम मंजील, ६ वा माळा, रूम नं ६०६, नारायण ध्रुए स्ट्रीट, पायधुनी, मुंबई ४००००३ |
| गुन्हा दाखल दिनांक व वेळ | दिनांक २३/११/२०२१ रोजी २३.१५ वा. चे सुमारास |
| अटक आरोपीची संख्या | ०१ पुरुष. |
| हस्तगत मुद्देमाल | १) भारतीय चलनाच्या रूपये २००० दराच्या 1KD 526853 या एकाच सिरीजच्या एकुण ५३ नोटा (दर्शनी किंमत रूपये एक लाख सहा हजार रूपये)<br>२) भारतीय चलनाच्या बनावट नोटा बनविण्यासाठी आरोपीने वापरलेले संगणक मॉनिटर, सी.पी.यु., किबोर्ड, माऊस, दोन प्रिंटर, इंकच्या चार बाटल्या, कार्ट्रेजची पाकिटे, रंगीत पेन, सफेद रंगाचे पेपर इत्यादी. |

**थोडक्यात हकिगत-**

दिनांक २३/११/२०२१ रोजी गुप्त बातमीदाराकडून खात्रीलायक खबर मिळाली की, एक इसम त्याचे वरील नमूद राहते घरी भारतीय चलनाच्या बनावट नोटा बनविण्याची साधने बाळगुन, बनावट नोटा तयार करतो.

त्याअनुषंगाने दिनांक २३/११/२०२१ रोजी १९.३० वा.चे सुमारास गुप्त बातमीदाराने दर्शविल्याप्रमाणे वरील नमूद घटनास्थळी दोन पंचासमक्ष छापा टाकून घरझडती घेतली असता, नमूद इसमाचे राहते घरी उपरोक्त नमुद प्रमाणे मुद्देमाल हस्तगत करण्यात आला व नमुद गुन्हयात आरोपीतास अटक करण्यात आली. आरोपीताबाबत मिळालेल्या अधिक माहितीनुसार आरोपीताविरूद्ध गुन्हे शाखेच्या अंमली पदार्थ विरोधी कक्ष, घाटकोपर, मुंबई यांनी अंमली पदार्थ तस्करीची कारवाई केल्याची व सिव्हील लाईन पो.ठाणे, अजमेर येथे बनावट डिमांड ड्राफ्ट बनविल्याबाबत फसवणुकीचे गुन्हा नोंद असल्याची माहिती प्राप्त झाली आहे. त्याबाबत अधिक तपास करण्यात येत आहे.

सदरची यशस्वी कामगिरी मा. पोलीस सह आयुक्त (गुन्हे) श्री. मिलिंद भारंबे, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. एस.विरेश प्रभु, मा. पोलीस उप-आयुक्त (प्रकटीकरण), श्री. प्रकाश जाधव, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त, (डि-विशेष) श्री. शशांक सांडभोर यांचे मार्गदर्शनाखाली प्रभारी पोलीस निरीक्षक, मिलिंद काठे, पो.नि. प्रशांत पवार, सपोनि. अभिजीत शिंदे, सपोनि प्रशांत सावंत, पोउनि रोशन रावराणे, पोउनि संजय साबळे, पो.ह.क्र. ३१४२७/सकट, पो.ना.क्र.०३११७१/जाधव, पो.ना.क्र. ०४०६७२/वाघमारे, पो.ना.क्र.०५००८९/शिर्के, पो.ना.क्र.०६०४८०/पवार, पो.शि.क्र.३२२७९/ देशपांडे, पो.शि.क्र. ०७१३०२/चौधरी, पो.शि.क्र. ०९१६५८/खंदारे, पो.शि.क्र. ०९०५८९ आणि पो.शि. क्र. ०९२९०६/ उथळे यांनी पार पाडलेली आहे.

*****

Scanned with CamScanner